अंक ६ वा

दिनांक :-
८ फेब्रुवारी २०२१

# सायबर सारथी

(साप्ताहिक माहितीपत्र)

## सायबर सेल

गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

# नोकऱ्यांचा घोटाळा आणि सायबर गुन्हा!

## नोकरी ऑफर्स च्या आमिषाने सायबर गुन्हेगार बेरोजगारांची करत आहेत फसवणूक ...!

हो, सायबर सेल गुन्हे शाखा पुणे पिंपरी-चिंचवड यांच्या असे निदर्शनास आले आहे की, अलीकडेच भरपूर बेरोजगार तरुणांना खोट्या नोकरीचे आमिष दाखवून सायबर गुन्हेगारांनी त्यांच्या जाळ्यात ओढले आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान वाढीमुळे आजकाल नोकरी शोधण्याचा मार्ग पूर्णपणे बदलला आहे, जेवढे काही बेरोजगार मंडळी किंवा नवीन नोकरीच्या शोधात असणाऱ्या व्यक्ती नोकरीचा ऑनलाइन शोध घेत आहेत यामुळे थोडे बहुत तांत्रिक ज्ञान, आणि नोकरी करिता उमेदवार सिलेक्ट करण्याची पद्धत माहित असलेल्या सायबर गुन्हेगारांना जनतेला फसवण्यासाठी अजून एक नवीन संधी मिळाली आहे.




नोकरी साठी फसवणूक ही एक अत्याधुनिक फसवणूक आहे जी नोकरी शोधणाऱ्यांना काल्पनिक नोकरीची संधी देत आहेत. बोगस वेबसाईट वरून नामांकित कंपनी मध्ये नोकरीची संधी असल्याचा दावा करून ऑनलाइन सेवांच्या माध्यमातून बनावटी ई-मेल द्वारे लोकांना नोकरीचे आमिष दाखवून त्यांना फसवले जाते यामुळे नोकरीची ऑफर खरी आहे की खोटी आहे हे पडताळणे अगदी कठीण झाले आहे.

# कशी होते फसवणुक?




**बेरोजगार किंवा नवीन चांगल्या पगाराच्या आणि संधीच्या शोधात असलेल्या व्यक्तींना सायबर गुन्हेगार संपर्क करून त्यांना चांगल्या पगाराची नामांकित कंपनीमध्ये नोकरीची ऑफर देतात.**

- त्याकरिता सुरुवातीला रजिस्ट्रेशन चार्ज च्या नावाखाली किरकोळ रक्कम आकारतात.
- पुढे त्यांचा टेलिफोनिक इंटरव्ह्यु ठरविला जातो. टेलिफोनिक इंटरव्ह्यु मध्ये अगदी सोपे आणि सहज प्रश्न विचारून उमेदवाराला निवडीची खात्री पटवून दिली जाते.
- त्यानंतर उमेदवारास त्याची कागदपत्रांची मागणी करून त्या कागदपत्रांचे वेरीफिकेशन चार्जेसच्या नावाखाली उमेदवाराकडून पैशाची मागणी केली जाते.
- कागदपत्र पडताळल्यानंतर उमेदवारास नोकरीचे बनावट जॉइनिंग लेटर पाठवून त्याला जॉइन करण्यापुर्वी सुरक्षा डिपॉजिट म्हणून एक किंवा दोन महिन्याच्या पगारची रक्कम भरण्यास सांगितली जाते. त्याची बनावट पावती देखील हे गुन्हेगार पाठवतात.
- भारताबाहेर नोकरीकरिता विसा चार्जेस, पासपोर्ट वेरीफिकेशन चार्जेसच्या नावाखाली असे गुन्हेगार मोठी रक्कम उकळतात.
- जेंव्हा निवड होऊनदेखील बरेच दिवस नोकरी देण्याऱ्याकडून संपर्क केला जात नाही तेंव्हा उमेदवारास आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येते.

**या प्रकारासोबत नामांकित कंपनीच्या नावाशी साधर्म्य असणारी वेबसाइट रजिस्टर करून त्यावर त्याच कंपनीचा लोगो वापरुन, नोकरी भरतीची जाहिरात देऊन त्याकरिता फॉर्म भरण्याच्या चार्जेसच्या नावाखाली फसवणूक केली जाते.**

# सूचनांचे पालन करा!

## आपण खाली दिलेल्या सूचनांचे पालन करून सायबर गुन्हेगारांपेक्षा एक पाऊल पुढे राहू शकतो!

- **सर्च इंजिन वर मिळणाऱ्या जाहिरातींची संधी टाळा:**
  कधीही जॉब सर्च करताना अस्सल जॉब पोर्टल किंवा वर्तमानपत्रांवर पोस्ट केलेल्या नोकरीसाठी अर्ज करा. सोशल मीडिया, सर्च इंजिन एडवर्टाइजमेंट, लेबल स्पॉन्सर लिंक, टेलीफोन कॉलद्वारे प्राप्त झालेल्या नोकरीच्या संधीला बळी पडू नका.

- **रिसर्च करणे:**
  कोणत्याही वेबसाइटवर नोकरी खरी आहे की खोटी आहे हे तपासण्यासाठी, त्यांनी दिलेल्या प्रोफाइल बद्दल अधिक जाणून घेण्यासाठी संबंधित कंपनीची वेबसाईट तपासणी करण्याचा नेहमीच प्रयत्न करा. बहुदा कंपन्या त्यांच्या करिअर सेक्शन (careers section) मध्ये त्यांच्या अधिकृत वेबसाईटवर मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास नोकरी संदर्भात पोस्ट करतात.

- **नोकरीच्या साईटचे गोपनीयता धोरण तपासा:**
  कोणत्याही ऑनलाइन जॉब सर्च पोर्टल वर नोंदणी करण्यापूर्वी वापरकर्त्यांना कडून जमा केलेल्या माहितीचा प्रकार कसा आहे आणि वेबसाईटद्वारे त्यावर प्रक्रिया कशी केली जाईल हे जाणून घेण्यासाठी वेबसाईटचे गोपनीयता धोरण तपासणे आवश्यक आहे. अनेक वेबसाइट त्यांच्या साइटवर रजिस्टर केलेल्या उमेदवारांचा डाटा हेड हंटिंगच्या गोंडस नावाखाली उघडलेल्या फेक एम्प्लॉयमेंट सर्विस एजन्सिला विक्री करतात.

- **अनपेक्षित ई-मेल ला प्रतिसाद देऊ नका:**
  आपण नोकरीसाठी कुठे नोंदणी केली आहे याची नोंद ठेवावी. अनोळखी कंपन्यांद्वारे प्राप्त झालेल्या सामान्य ई-मेलला प्रतिसाद देऊ नका कारण हा सापळा असू शकतो.

- **बनावटी सरकारी नोकरीची संधी:**
  सरकारी नोकरीसाठी प्रसिद्ध वृत्तमान पत्रामध्ये आणि रोजगार बातम्यांमध्ये रिक्त पदे असल्याची माहिती मिळते तरीही सरकारी नोकरीची संधी जाणून घेण्यासाठी नेहमीच सरकारी संस्थांची वेबसाईट तपासा. सर्व सरकारी वेबसाईट ॲड्रेस मध्ये gov.in किंवा nic.in असा उल्लेख असतो. (उदा. www.mha.gov.in)

- **ई-मेल मध्ये स्पेलिंग तपासणे:**
  ज्या ई-मेल द्वारे तुम्हाला नोकरीची संधी प्राप्त झाली आहे त्या मेलला एकदा नक्कीच तपासा. ई-मेल हुबेहूब कंपनी सारखा असतो पण त्यामध्ये काही व्याकरणाच्या किंवा कंपनीच्या नावामध्ये किंवा काही उच्चरण चुका असतील तर नक्कीच हा घोटाळा असू शकतो.

# व्हेरिफाईड जॉब पोर्टलचा वापर करा!

**असे निदर्शनास येते की, आजकाल बरीच जॉब पोर्टल Resume promotion, Resume writing, आणि जॉब अलर्ट साठी देय सेवा पुरवतात. अशाप्रकारच्या पोर्टल ला पैसे देण्यापूर्वी त्या वेबसाईटची सत्यता तपासा तसेच याबाबत विश्वासातील व्यक्तींकडून सल्ला घ्या.**

- **नोकरीसाठी कधीही पैसे देऊ नका:**
  पैशांच्या बदल्यात नोकरी देणाऱ्या स्पॅम ई-मेल ला प्रतिसाद देऊ नका. कोणतीही कंपनी किंवा संस्था नोकरीसाठी पैशाची मागणी करत नाही.

- **ऑनलाइन इंटरव्ह्यु:**
  आज-काल बऱ्याच संस्था किंवा कंपन्यांद्वारे इंटरव्ह्यु ऑनलाईन पद्धतीने घेतले जातात जसे की, टेलिफोन, चॅट सर्विस, गुगल हँग आऊट, स्कायपी कॉल. तर अशा प्रकारच्या इंटरव्ह्यु ला सामोरे जाताना रिप्रेझेंटेटिव्ह बद्दल आणि संबंधित कंपनी बद्दल माहितीची योग्य पडताळणी करावी.

- **बनावट ऑफर लेटर पासून सावध रहा:**
  नामांकित कंपनीचे लोगो वापरुन आणि त्यांचे अधिकाऱ्यांचे नाव वापरुन डिजिटली बनावट ऑफर लेटर तयार केले जातात. तुम्हाला असे ऑफर लेटर प्राप्त झाल्यास ते संबंधित कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळ तपासून त्यावर नमूद मेल आयडी वर मेल पाठवून प्राप्त ऑफर लेटरची पडताळणी करा.



# सावध व्हा, सुरक्षित रहा

अधिक माहिती करिता संपर्क -

## सायबर सेल

गुन्हे शाखा,

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय

**Mail- cybercell.pcpc-mh@mahapolice.gov.in**

**Contact No.- 020- 27350939**